स्वामी रामानंद तीर्थ मराठवाडा विद्यापीठ, नांदेड

मानव्य विद्याशाखे अंतर्गत "इतिहास" विषयातील विद्यावाचस्पती
(पीएच्- डी) पदवीसाठी सादर करण्यात येणाऱ्या शोधप्रबंधाचा गोषवारा

संशोधन विषय

"मराठवाड्यातील दुर्लक्षीत ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास"

(लेण्या, मंदिरे, किल्ले)

संशोधक

प्रा. रमेश बापूराव जोगदंड

कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय, तीर्थपूरी
ता.घनसावंगी जि. जालना

मार्गदर्शक

डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे

प्राध्यापक व विभागप्रमुख
पदवी, पदव्युत्तर इतिहास विभाग व संशोधन केंद्र,
यशवंत महाविद्यालय, नांदेड

ऑगस्ट 2024

"मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास"
(लेण्या, मंदिरे, किल्ले)

प्रस्तावना :-

मराठी भाषा बोलणा-या लोकांच्या भूप्रदेशाला 'मराठवाडा' या नावाने ओळखला जातो मराठवाडा हा महाराष्ट्र राज्याचा एक प्रशासकीय विभाग आहे. या विभागात औरंगाबाद, जालना, परभणी, हिंगोली, नांदेड, बीड, लातूर व उस्मानाबाद या आठ जिल्ह्यांचा समावेश होतो. मराठवाड्याला प्राचीन इतिहास आणि संस्कृतीचा फार मोठा वारसा लाभलेला असून देशाच्या इतिहास आणि संस्कृतीच्या जडण घडणीत मराठवाड्याचा महत्वाचा वाटा आहे. मराठवाड्याचा भूभाग अतिप्राचीन असून तो अश्मक म्हणून तो ओळखला जात होता. पुढे सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव अशा कर्तृत्व संपन्न राज्यकर्त्यांनी या परिसरावर राज्यकारभार केला, लेण्या, मंदिरे, किल्ले यांची निर्मिती केली. तसेच इतरही अनेक स्मारकांची उभारणी यांच्या कालखंडात झालेली दिसून येते. प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात मराठवाडा वैभवाच्या शिखरावर होता मराठवाड्यातील दुर्लक्षीत ऐतिहासिक पर्यटक स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) हा संशोधनाच्या दृष्टीने अतिशय अभ्यासनीय ठरतो. ऐतिहासिक सांस्कृतीक वैभ्व मराठवाड्याला लाभले त्याचा वापर रोजगार निर्मिती आणि पैसा निर्माण करण्यासाठी आपण करु शकतो पर्यटन क्षेत्रात विकासाच्या अमर्याद संधी, रोज स्वयंरोजगाराच्या संधी याचा नियोजनबध्द विकास केल्यास देशी - विदेशी पर्यटकांच्या संख्येत वाढ होवून मराठवाड्याची आर्थिक स्थिती मजबुत होवू शकते हे सदर संशोधनातुन स्पष्ट करण्याचा प्रयत्न आहे.

1. विषयाची निवड

मराठवाड्याला फार मोठा ऐतिहासिक वारसा लाभलेला आहे, सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव या राजवटी होवून गेल्या त्यांच्या काळात लेण्या मंदिरे किल्ले निर्माण झाले परंतु संशोधनात त्याचे महत्व असून हा संशोधनात्मक दृष्ट्या अभ्यास झाला नाही म्हणून प्रस्तुत विषयाची निवड करण्यात आली आहे.

2. संशोधनाची उद्दिष्ट्ये :

कोणत्याही संशोधनाची सुरवात उद्दीष्टांच्या निश्चितेतुन होत असते त्या दृष्टीने प्रस्तुत संशोधन करतांना पुढील उद्दीष्टे ठरविण्यात आली आहेत.

1. मराठवाड्याची ऐतिहासिक - भौगोलिक पार्श्वभूमिचा अभ्यास करणे

2. मराठवाड्.यात सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव यांच्या काळातील लेण्या मंदिरे किल्ले यांचा अभ्यास करणे
3. मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांना सर्वज्ञात करणे.
4. मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांची आजची अवस्था कशा प्रकारची आहे याचा अभ्यास करणे.
5. मराठवाड्यातील ऐतिहासिक वारशांचे जतन करणे.

3. संशोधनाची गृहितके :

प्रस्तुत संशोधनासाठी खालील गृहितके निश्चित करण्यात आलेली आहे.

1. मराठवाड्याला फार मोठा ऐतिहासिक व भौगोलिक वारसा लाभला आहे.
2. सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव या राज्यकर्त्यांनी मराठवाड्यात लेणी, मंदिरे, किल्ले उभारणीसाठी महत्वाचे योगदान दिले.
3. मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक स्थळे पर्यटन उद्योगासाठी सक्षम आहेत.
4. मराठवाड्याच्या दुर्लक्षित पर्यटन स्थळे अनेकांना रोजगाराच्या संधी उपलब्ध करुन देवू शकतात.
5. मराठवाड्याच्या दुर्लक्षित पर्यटनाच्या उद्योगामधुन मराठवाड्याच्या ऐतिहासिक संस्कृतीचे जतन होऊ शकते.
6. पर्यटन उद्योग निर्माण झाल्यानंतर जी ऐतिहासिक स्मारके नष्ट होऊ लागलीत त्यांचे संवर्धन होऊ शकते.
7. दुर्लक्षित पर्यटनाच्याद्वारे मराठवाड्याच्या आर्थिक, सामाजिक, संस्कृतिक परिस्थितीत मोठा बदल होऊ शकतो.
8. सरकार आणि लोकसहभागातून दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांची योग्य प्रसिध्दी आणि जोपासना केली तर मराठवाड्याचे आर्थिक परिवर्तन होऊ शकते.

4. तथ्य संकलन

सामाजीक क्षेत्रात तथ्य संकलनाचे प्रमुख दोन भाग आहेत. प्राथमीक स्त्रोत व दुय्यम स्त्रोत मराठवाडयातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) या विषयाचे संशोधन करण्यासाठी प्राथमिक व दुय्यम स्वरूपाच्या साधानाचा उपयोग करण्यात येईल. संशोधनासाठी

अ- प्राथमिक साधनात स्थळभेटी, सर्व्हेक्षण, इत्यादी छायाचित्रे, गॅझेटिअर, निवडक ग्रंथ, तसेच दुय्यम साधानामध्ये प्रकाशित संदर्भ ग्रंध,

ब- दुय्यम साधनामध्ये प्रकाशीत संदर्भ ग्रंथ विविध कोष, वृतपत्र मासिके, प्रकाशित संदर्भ ग्रंथ सारख्या संदर्भ साधनांचा उपयोग करुन संशोधन पूर्ण करण्यात येईल.

5. संशोधनाचा कालावधी

मराठवाडयातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) अभ्यास विषयाची संबंधीत असलेली स्थळे ही मराठवाडयाच्या प्राचीन अश्मयुगीन काळापासून ओळख करुन घेत असतांना सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, यादव काळातील लेण्या मंदिरे किल्ले ही विविध राज्यशासनाच्या काळातील आहेत.

6. संशोधन अभ्यासपध्दती :

मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) प्राचीन आणि मध्ययुगीन कालखंडात राजसत्ता आणि लोकसहभागातून मराठवाड्याच्या परिसरात लेण्या, मंदिरे, किल्ले आणि इतर ऐतिहासिक स्मारके यांची उभारणी करण्यात आली, परंतु संशोधनात अभ्यासासाठी ऐतिहासिक वर्णनात्मक विश्लेषणात्मक क्षेत्रा निरिक्षण या पदध्दतीचा अवलंब करण्यात येणार आहे. या विषयासंबंधी उपलब्ध असलेल्या ग्रंथाचा जिल्हानिहाय गॅझेटिअर शिलालेख, छायाचित्रे, नकाशे, मासिके, वृत्तपत्रे यांचे या विषयाच्या संशोधनासाठी अध्ययन करण्यात येईल.

7. पुर्व संशोधनाचा आढावा :-

प्रस्तुत संशोधन विषयाच्या संशोधनासाठी वापरण्यात येणाऱ्या लेखन साहित्याचा आढावा घेऊन संशोधन वस्तुनिष्ठ करण्यासाठी साहित्य परिक्षण महत्वपुर्ण ठरते तसेच मागे झालेल्या शोध कार्यापेक्षा नविन संशोधन कोणते करावयाचे आहे याची दिशा संशोधकला मिळण्यासाठी खालील निवडक साहित्याचा आढावा घेण्यात येणार आहे.

7. 1. मोरवंचीकर, रा. श्री. : - 'सातवाहनकालीन महाराष्ट्र' हा 315 पृष्ठांचा ग्रंथ, प्रतिमा प्रकाशन,औरंगाबाद, यांनी प्रकाशित केला आहे.' या ग्रंथात त्यांनी इ.पु. 230 ते इ.स 230 या 400 वर्षाच्या प्रदीर्घ सातवाहन सत्तेचा सामाजिक, आर्थिक, राजकीय, धार्मिक, सांस्कृतिक इतिहासाची मांडणी केलेली आहे.

7.2. देशपांडे, ब्रह्मानंद :- देवगिरीचे यादव' हा ग्रंथ प्रकाशक श्री. बोर्डे व मुद्रक श्री. शेळके यांनी प्रकाशित केला एकूण 197 पृष्ठाचा हा ग्रंथ मराठवाड्याच्या यादवकालीन घटनांचा सविस्तर माहिती देणारा हा एकमेव ग्रंथ असावा 2. 2 या ग्रंथात डॉ. देशपांडे यांनी यादवांच्या इतिहासाची मांडणी केलेली आहे. संस्कृत, मराठी, कानडी शिलालेख, ताम्रपट आणि महानुभाव साहित्याचा अभ्यास करून या ग्रंथाची मांडणी केलेली आहे.

7.3. कुरेशी, दुलारी व कुरेशी, रफत (2018) : या लेखकद्वयींचा 'औरंगाबादनामा' हा ग्रंथ विद्या बुक्स औरंगाबाद, यांनी प्रकाशित केला आहे. औरंगाबाद शहराची प्राचीन, मध्ययुगीन माहिती

सांगणारा हा ग्रंथ प्रथम उर्दूमध्ये प्रकाशित झालेला होता पुढे 2018 मध्ये काही सुधारणा करून विद्या बुक्सने त्याची मराठी आवृत्ती प्रकाशित केली. औरंगाबादच्या लेण्यापासून सुरुवात करून विजयापूरची आदिलशाही, मोगल आणि शेवटचा निजाम संस्थानापर्यंतची अतिशय अभ्यास पूर्ण मांडणी केली आहे.

7.4. देशमुख, सुधाकर (2010) : ‘उदगीरचा इतिहास’ हा 206 पृष्ठसंख्येचा ग्रंथ, जनशक्ती वाचक चळवळ, औरंगाबाद, यांनी प्रकाशित केला आहे. व्यवसायाने सर्जन असणारे डॉ. सुधाकर देशमुख यांनी शहरांचा इतिहास कसा असावा अथवा स्थानिक इतिहासाचे एक प्रकारे उदाहरण आपल्या समोर रेखाटले आहे. प्रस्तुत ग्रंथात उपयुक्त नकाशे, छायाचित्र आणि संदर्भग्रंथ यामधून त्यांनी उदगीर शहराचे ऐतिहासिक, सांस्कृतिक जीवन परिचय करून देण्याचे काम केले आहे.

7.5. टिपरे, राधिका (2018) : ‘वेरुळ लेण्यातील शिल्पवैभव' हा 284 पृष्ठे असणारा लघुशोधप्रबंध, मेहता पब्लिशिंग हाऊस, पुणे, प्रकाशनाने प्रकाशित केलेला आहे. हा महाराष्ट्रातील नव्हे तर जागतिक वारसा म्हणून युनोने वेरुळचा समावेश केला आहे. मराठवाड्यातील अजिंठा, वेरुळ ही दोन जागतिक वारसास्थळे मराठवाडयाच्या वैभवात भर टाकणारे आहेत. ग्रंथाच्या लेखिका राधिका टिपरे यांनी या ग्रंथात मांडणी केलेली आहे.

7.6. घाणेकर, प्र. के. (2005) : 'अथातो दुर्गजिज्ञासा' हा 194 पृष्ठांचा ग्रंथ स्मिता प्रिंटर्स, पुणे यांनी प्रकाशित केलेला आहे.' अथातो दुर्गजिज्ञासा या ग्रंथात लेखक प्र. के. घाणेकरांनी महाराष्ट्राच्या किल्ल्यासंबंधी अतिशय अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

7.7. पाठक, अ.श. (संपा) (2009) : स्थापत्य व कला (प्रारंभिक ऐतिहासिक काळ ते यादवकाळ) हा 271 पृष्ठांचा ग्रंथ दर्शनिका विभाग, महाराष्ट्र शासन यांच्या सहकार्याने प्रकाशित केला आहे. संपादक डॉ. अ.श. पाठक यांनी प्रारंभिक काळापासून ते यादव काळापर्यंत महाराष्ट्रातील लेणी, स्थापत्य आणि बांधीव मंदिरे यांची अभ्यासपूर्ण मांडणी केलेली आहे.

7.8 माटे, म. श्री. (2016) : ‘निधीवास ते देवगिरी’ हा 191 पृष्ठांचा ग्रंथ, देशमुख आणि कंपनी, पुणे, यांनी प्रकाशित केला आहे. निधीवास ते देवगिरी (नेवासे ते दौलताबाद) या ग्रंथात लेखकाने पुरातत्व, इतिहास, वास्तुशास्त्र आणि वास्तुशिल्प, परिचित - अपरिचित या वेगवेगळ्या प्रकरणात प्रत्येकी सहा भागामध्ये प्रकरणाची विभागणी करुन या ग्रंथाची मागणी केलेली आहे.

7.9. देशपांडे, मधुसुदन नरहर : वेरुळ लेणी, हा ग्रंथ अपरांत प्रकाशन, पुणे यांनी प्रकाशित केलेला आहे." वेरुळ लेणी या ग्रंथाचे लेखक भारतीय पुरातत्व सर्वेक्षणात महानिदेशक पदावर

कार्यरत होते. भारतातील पुणे, औरंगाबाद आणि बडोदा पुरातत्वीय मंडळात पुरातत्वीय अधिक्षक म्हणून काम केले. त्यांना शैल स्थापत्याबदल विशेष रुची असल्यामुळे वेरुळ येथील लेण्याची अतिशय अभ्यासपुर्ण मांडणी या ग्रंथात केलेली दिसून येते.

7.10. पाठक, अरुणचंद्र श. (2019) : मराठवाडा एक सांस्कृतिक मागोवा' हा 257 पृष्ठसंख्येचा ग्रंथ, विद्या बुक्स, औरंगाबाद, यांनी प्रकाशित केला आहे.' मराठवाडा : एक सांस्कृतिक मागोवा या ग्रंथात लेखकाने मराठवाड्याच्या इतिहासाचे प्राचीन कालखंड, मध्ययुगीन कालखंड आणि उत्तर मध्ययुगीन कालखंड या तीन भागात या ग्रंथाची मांडणी केली आहे.

7.11. देगलूरकर, गो.ब. (2004) : सुरसुंदरी (मंदिराच्या बाह्यांगावरील स्त्री प्रतिमा) हा 70 पृष्ठांचा ग्रंथ भारतीय विद्या भवन, पुणे, यांनी प्रकाशित केला आहे. 10 भारतीय संस्कृतीची जी काही वैशिष्ट्ये आहेत त्यापैकी मंदिर स्थापत्य हे एक अतिशय महत्वाचे अंग आहे. धर्म, तत्त्वज्ञान, अध्यात्म याद्वारे मानवी संस्कृतीच्या अभ्यासाची मांडणी केलेली आहे.

7.12. देव, प्रभाकर (1972) : 'टेंपल्स ऑफ मराठवाडा' या विषयावर आपला पीएच.डी. शोधप्रबंध मराठवाडा **विघापीठ**, औरंगाबाद. येथे सादर केलेला आहे12. 12 या शोध प्रबंधात मराठवाड्यातील सातवाहन, राष्ट्रकुट, चालुक्य, यादव काळातील बांधलेल्या विटा आणि दगडाच्या मंदिरांचा अभ्यास केलेला आहे. संशोधकाने मराठवाड्यातील मंदिर स्थापत्याच्या अभ्यासाची मांडणी केली आहे.

8. संशोधन विषयाचे महत्व :

मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) हा विषय निवडण्याचा उद्देश मराठवाड्याच्या ऐतिहासिक संस्कृतीचा ठेवा दिवसेंदिवस नष्ट होण्याच्या मार्गावर आहे. या ऐतिहासिक स्मारकांचे जतन, संवर्धन करण्यासाठी आणि मराठवाड्याचा दुर्लक्षितपर्यटन उद्योग विकसित करण्यासाठी सदर विषयाची निवड करण्यात आली आहे. जगातील अनेकदेशांच्या अर्थव्यवस्था पर्यटन उद्योगावर आधारित आहेत. आपल्या देशातील जम्मू-काश्मीर, गोवा,केरळ, हिमाचल प्रदेश या राज्याच्या अर्थव्यवस्था पर्यटनावर आधारित आहेत. या राज्यांनी पर्यटनाद्वारे स्थानिक लोकांना रोजगार उपलब्ध करून दिला. मराठवाड्यातील ऐतिहासिक स्मारके पर्यटकांपासून दुर्लक्षित आहेत. या स्मारकांची योग्य काळजी घेतली आणि प्रसिध्दी केली तर मराठवाड्यातील तरुणांनामोठ्या प्रमाणात रोजगार निर्माण होऊ शकतो. यातून वाढत्या लोकसंख्येला रोजगाराची हमी देणारा हापर्यटन उद्योग ठरू शकतो या दृष्टिकोणातून हा अभ्यास महत्वाचा आहे व मार्गदर्शक ठरणारा असूनअन्य संशोधनांच्यापेक्षा वेगळा आहे.

या संशोधनातून प्राप्त झालेल्या ज्ञानाचा उपयोग प्रस्तापित ज्ञानात भर घालणारा व वृध्दिंगत करणारा असून व्यावहारिक व व्यावसायिक उपयोगासाठी होऊ शकतो.

9. संशोधन विषयाची प्रकरण निहाय रचना :

मराठवाड्यातील दुर्लक्षित ऐतिहासिक पर्यटन स्थळांचा अभ्यास (लेण्या, मंदिरे, किल्ले) या विषयातील संशोधन कार्य पाच प्रकरणात विभागलेले आहे.

प्रकरण पहिले - मराठवाड्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमी

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्याची ऐतिहासिक व भौगोलिक पार्श्वभूमीचा आढावा घेतला जाणार आहे. मराठवाड्याचे क्षेत्रफळ, नद्या, डोंगर रांगा, पर्वत, हवामान, लोकसंख्या, पिके, खनिजे, जंगले यासोबतच ऐतिहासीक अभ्यास करतांना सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, यादव यांच्या काळातील लेण्या, मंदिरे, किल्ले यांचा अभ्यास पर्यटनाच्या दृष्टीने केला जाणार आहे.

प्रकरण दुसरे - मराठवाड्यातील दुर्लक्षित लेण्या :

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, यादव यांच्या राजवटी होऊन गेल्या, सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, यादव कालीन लेण्या मराठवाडा भागात दिसून येतात याचा अभ्यास केला जाणार आहे,.

प्रकरण तिसरे - मराठवाड्यातील दुर्लक्षित मंदिरे :

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्याच्या परिसरात सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, यादव काळात मंदिरे उभी राहिली, आधी कळस मग पाया, कैलास मंदिर अशा मंदिराचा अभ्यास केला जाणार आहे.

प्रकरण चौथे - मराठवाड्यातील दुर्लक्षित किल्ले:

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्याच्या सातवाहन, राष्ट्रकुट, वाकाटक, चालुक्य, यादव या काळातील किल्यांचा अभ्यास पर्यटनाच्या दृष्टीने करण्यात येणार आहे.

प्रकरण पाचवे- मराठवाड्यातील पर्यटन उद्योगाचा विकास रोजगार, स्वंयरोजगाराच्या संधी आणि दुर्लक्षीत पर्यटन स्थळे

प्रस्तुत प्रकरणात मराठवाड्यातील पर्यटन उद्योगाच्या विकासातुन रोजगाराच्या स्वयंरोजगाराच्या संधी कशा निर्माण करता येतील आणि मराठवाड्यात इतर ही अनेक पर्यटन स्थळे आहेत त्या संबंधी अभ्यास करण्यात येईल.

प्रकरण सहावे- निष्कर्ष

वरील प्रकरणाच्या अभ्यासातुन निष्कर्ष काढले जाणार आहेत.

<u>संदर्भ ग्रंथसूची</u>

1. अगरवाल, ओ.पी. (1998) : कला वस्तु आणि ग्रंथालय साहित्याचे जतन, तिसरी आवृत्ती, नॅशनल बुक ट्रस्ट इंडिया, दिल्ली.
2.आगलावे, प्रदिप (2007) : सामाजिक संशोधन पध्दती, श्री साईनाथ प्रकाशन, सुधारित आवृत्ती, नागपूर.
3. आळतेकर, स.ख. (1933) : श्री समर्थ चरित्र, कॉन्टिनेन्टल प्रकाशन, पुणे.
4. कार, ई.एच. (अनु.) (2012) : इतिहास म्हणजे काय, दुसरी आवृत्ती, कॉन्टिनेटल प्रकाशन, पुणे.
5. काळे, भगवान (1986) : मराठवाडा काल आणि आज, पहिली आवृत्ती, संकेत प्रकाशन, औरंगाबाद.
6. काळे, भगवान (2004) : किल्ले धारुर, पहिली आवृत्ती, संकेत प्रकाशन, जालना.
7. काळे, भगवानराव (2006) : जालना जिल्हा, राजमुद्रा ऑफसेट, औरंगाबाद.
8. काळे, भगवान (1990) : समर्थाची पुण्यभूमी : जिल्हे जालना, स्वास्तिसी वर्ष 15, अंक 7, पुणे.

English References -

1. Bhatia, A.K. (1998): Tourism in India, Sterling Publications, First Edition, New Delhi.
2. Bhatia, A.K. (2001) : International Tourism Management, Sterling Publications, First
Edition, New Delhi.
3. Bhatia, A.K. (1997): Toursim Management and Marketing, Sterling Publishers Limited, First Edition, New Delhi.

धार्मिक संदर्भ ग्रंथ

1. कुलकर्णी, ल.न. (संपा.) (2006) : श्री समर्थ चरित्रातील गोष्टी, द्वितीय आवृत्ती, श्री समर्थ संस्थान, सातारा.
2. गोखले, म.वि. (संपा.) (2008) : विवेक सिंधु, चतुर्थावृत्ती, यशवंत प्रकाशन, पुणे.
3. बापट, विष्णुशास्त्री (अनु.) : श्री मनुस्मृती, गिडुमल संस्कृत पाठशाळा, हैद्राबाद.

गॅझेटिअर

1. चौधरी, की.का. (1988) : महाराष्ट्र राज्य गॅझेटियर परभणी जिल्हा, प्रथम आवृत्ती, दर्शनिका विभाग, मुंबई.

2. पाठक, अरुणचंद्र (संपा.) (2008) : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर लातूर भाग -2, दर्शनिका विभाग, द्वितीय आवृत्ती, मुंबई.
3. पाठक, अंश (संपा.) (2009) : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर (खंड -1, भाग -2) स्थापात्य व कला, दर्शनिका विभाग, द्वितीय आवृत्ती, मुंबई.
4. पाठक, अरुणचंद्र (2010) : महाराष्ट्र राज्य गॅझेटिअर इतिहास : प्राचीन काळ खंड -1, दर्शनिका विभाग, द्वितीय आवृत्ती, मुंबई.

टिप :- संशोधनाला जशी जशी गती येईल तसे तसे संशोधन आराखड्यात थोडा बहुत बदल संभवतो.

संशोधक

प्रा. रमेश बापूराव जोगदंड
कला, विज्ञान व वाणिज्य महाविद्यालय
तिथपुरी ता. घनसावंगी जि. जालना

मार्गदर्शक

डॉ. शिवराज चंद्रकांत बोकडे
प्राध्यापक व विभाग प्रमुख
पदवी, पदव्युत्तार इतिहास विभाग व संशोधन केंद्रा
यशवंत महाविद्यालय, नांदेड